दिनांक :– १४.०७.२०२०.

**प्रेसनोट**

**आरोपी लोकसेवक दत्तात्रय हरिश्चंद्र शिंदे, वय–४८ वर्ष, सहाय्यक लेखाधिकारी, वर्ग–३, पंचायत समिती कळमनुरी यांनी ७,०००/–रू. ची लाच स्विकारले प्रकरणी त्यांना ताब्यात घेण्यात आले.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि.१४.०७.२०२० रोजी तक्रार दिली होती की, ग्रामपंचायत भाटेगावचे स्वच्छ भारत मिशन ग्रामीण या योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांचे शौचालय बांधकामाचे अग्रीमचा ३,८४,०००/–रू. चे चेकवर बी.डी.ओ. पंचायत समिती कळमनुरी यांची सही घेवून चेक देण्यासाठी पंचायत समिती कळमनुरीचे अकाउंटट श्री शिंदे हे बी.डी.ओ. कळमनुरी श्री खिल्लारी यांचेसाठी ८,०००/–रू. व स्वत:साठी १,०००/–रू. अशी ९,०००/–रू. ची लाचेची मागणी करीत असल्याबाबत अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली येथे तक्रार दिली होती.

त्यावरून दि.१४.०७.२०२० रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली. सदर तक्रार पडताळणीमध्ये लोकसेवक दत्तात्रय शिंदे, सहाय्यक लेखाधिकारी पंचायत समिती कळमनुरी यांनी बी.डी.ओ. कळमनुरी श्री खिल्लारी यांचेसाठी ८,०००/–रू. व स्वत:साठी १,०००/–रू. अशी ९,०००/–रू. ची लाचेची मागणी करून तडजोडी अंती बी.डी.ओ. यांचेसाठी ५,०००/–रू. व स्वत:साठी २,०००/–रू. अशी लाचेची रक्कम ७,०००/–रू. स्विकारण्यास सहमती देवून ती लाचेची रक्कम ७,०००/–रू. दिनांक १४.०७.२०२० रोजी सायंकाळी १७.१३ वाजताचे सुमारास पंचायत समिती कार्यालय कळमनुरी येथे स्विकारली त्यावरून लोकसेवक शिंदे, सहाय्यक लेखाधिकारी, वर्ग–३, पंचायत समिती कळमनुरी यांना लाचेच्या रकमेसह पकडण्यात आले आहे. पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री हनुमंत गायकवाड, पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी पोलीस निरीक्षक श्री नितीन देशमुख व पोलीस निरीक्षक श्रीमती ममता अफुने, ए.एस.आय. श्री संभाजी बुरकुले, पोना श्री तान्हाजी मुंडे, पोना श्री विनोद देशमुख, पोना श्री संतोष दुमाने, पोना श्री अवि किर्तनकार, पोना श्री ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोना महारूद्र कबाडे, पोशि श्री प्रमोद थोरात, चापोना श्री सरनाईक अँ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अँन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अँन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.१०६४**, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५,
मोबाईल क्रमांक :– ८८८८७१७९९९, ९९२३०४२५६५, ८३९०७६१५०३

Scanned by CamScanner